# SUCCESS KEY TEST SERIES

**Unit Test- 2**


**Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 2Hrs**

**Date :** | **Chapter 5 to 7** | **Max Marks: 40**

**विभाग १ : गद्‌य**

**Q.1 खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

प्र. 1. अ. आकृतीबंध पूर्ण करा. (1)




आ. कंसातील योग्य पर्याय वापरून रिकाम्या जागा भरा. (1)

i. बांधीव पायऱ्या पार करून अरूंद पायवाटेने _______ च्या झाडीतून हृदयाची धडधड वाढवणारा ट्रेक सुरू होतो.

(करावी /कारवी /कारावी /कार्वी )

ii. डोंगरधारेच्या कड्यावरून जाणारी अरुंद पायवाट एका ______ येऊन थांबते.

(पठारावर / बुरुजावर / टोकावर / सपाटीवर)

परत एकदा आपण डांबरी रस्त्यावर येतो. उजव्या हाताच्या वळणावर कावळ्या किल्ल्याकडे जाणाऱ्या पायवाटेवर नजर स्थिरावते. बांधीव पायऱ्या पार करून अरूंद पायवाटेने कारवीच्या झाडीतून हृदयाची धडधड वाढवणारा ट्रेक सुरू होतो. वरंधा घाटाच्या उत्तरेला पसरलेल्या डोंगराच्या सोंडेवरून जाताना , डावीकडे खाली वरंधा घाटाचा कोकणात उतरत जाणारा वळणावळणाचा रस्ता दिसतो. इथून पाय सटकला, की थेट समर्थांच्या शिवथरघळीत! तेव्हा जर कोकणात जायचं नसेल , तर देशावरच्या मातीत सावधपणे पावलं टाकत टाकत जायला हवं. डोंगरधारेच्या कड्यावरून जाणारी अरुंद पायवाट एका सपाटीवर येऊन थांबते. तशी सपाटीही अरुंदच. तिथून पुन्हा एकदा कारवीची झाडी बाजूला करत करत शेवटी एका टेकाडाची उतरण उतरून अखेरची चढाई समोर येते. इथून वरंधा घाटाचं मस्त दर्शन घडतं. डोंगराच्या सोंडेच्या शेवटी जोत्याचे अवशेष आणि ढासळून गेलेल्या बुरुजाचे अवशेष दिसतात. कोकणातला निसर्ग पाहत काही वेळ इथेच शांत उभं राहायला हवं. निसर्ग गीत अनुभवायला हवं. परतीच्या प्रवासात डोळ्यांत साठवलेले ते पावसाचे चार क्षण, अरूंद पायवाटेवरून अनुभवलेला तो थरार, कारवीच्या झाडाचे ते काडकन् मोडणं आणि त्याचा आवाज ऐकून काळजात लख्ख होणं , अन् लगेच त्यातून सावरणं हे सारं सारं काही आठवत राहतं. हसता हसता रडवणारा आणि रडत रडत हसवणारा हा ट्रेक एन्जॉय करायचा असेल तर वरंधा घाटाच्या दिशेने आपल्या गाडीची चाकं वळवायला हवी.

प्र. 2. अ. पाठाच्या आधारे चूक कि बरोबर ते लिहा . (1)

i. तेव्हा जर कोकणात जायचं नसेल, तर देशावरच्या मातीत धावत पळत जायला हवं.

ii. बांधीव पायऱ्या पार करून अरूंद पायवाटेने कारवीच्या झाडीतून हृदयाची धडधड वाढवणारा ट्रेक

सुरू होतो.

प्र. 3. खालील शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा. (2)

(अ) जिगरबाज भटके (आ) रंगिली पायवाट


(इ) डोंगराची सोंड (ई) निसर्गगीत

प्र. 4. कावळ्या किल्ल्याचा ट्रेक – वर्णन करा. (2)

**विभाग २ : पद्य**

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

प्र. 1. आकृतिबंध पूर्ण करा. (2)




आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ।।
श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ।।

इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ।।

माणुसकीचे अभंग नाते
अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही ।।

कोटि कोटि हे बळकट बाहू
जगन्नाथ-रथ ओढुन नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही ।।

प्र. 2. खालील अर्थाचे कवितेतील शब्द शोधा. (2)

(अ) किनारा (आ) इच्छा (इ) अखंड (ई) आकाश

प्र. 3. अ. कवितेतील ‘आत्मविश्वास’ व्यक्त करणाऱ्या काव्यपंक्ती लिहा. (1)

आ. कवितेतील ऐक्याचा संदेश देणाऱ्या काव्यपंक्ती लिहा (1)

प्र. 4. ‘माणुसकीचे अभंग नाते , आम्हीच अमुचे भाग्यविधाते ’, या काव्यपंक्तीमधील भाव तुमच्या शब्दात मांडा. (2)

## विभाग ३ : व्याकरण

**Q.3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा** **2**

**(i)** अरे, अरे, एका दमात किती प्रश्न विचारता शामराव?

**(ii)** ती रोज सकाळी लवकर उठते.

**(ख) विरुद्धार्थी शब्द लिहा** **2**

**(i)** दिवस

**(ii)** कमी

**(ग) खालील वाक्यातील योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **2**

**(i)** मी कोण आहे माहीत आहे का?

**(ii)** तो म्हणाला तु जिंकलास.

**(घ) पुढील शब्दसमूहासाठी इंग्रजी प्रतिशब्द लिहा** **3**

**(i)** रंग भरणे

**(ii)** वाचन करणे

**(iii)** प्रचार करणे

## विभाग ४ : उपयोजित लेखन

**Q.4 (i) खालील जाहिरात वाचा आणि एका विषयावर पत्रलेखन करा.** **5**



**(ii) पुढील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न तयार करा:** **5**

कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज गावी २२ सप्टेंबर १८८७ ला जन्मलेले हे बालक बालपणापासून हट्टी स्वभावाचे होते. वडील सरकारी नोकरीत, त्यामुळे वडिलांसोबत भाऊरावांच्या पायालाही भिंगरी लागलेली. परंतु भाऊरावांचे मामा हे पैलवान, त्याचा मित्र सत्याप्पा हा तर शूर साहसी अन् त्याबरोबर दयाळू अन् गरिबांचा वाली. तो श्रीमंताकडून मिळालेले पैसे गोरगरिबात वाटून टाकत असे. त्याच्या चातुर्याच्या, हिमतीच्या चांगुलपणाच्या गोष्टींचा प्रभाव भाऊरावांवर चांगलाच होत होता. अन्यायाविरुद्ध बंड करण्याचे बाळकडू त्यांना लहानपणीच सत्याप्प्याकडून मिळाले होते.भाऊरावांचे शिक्षण बेताचेच. वसतिगृहात शिकत असताना तेथील नियम हे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध दिसल्याबरोबर भाऊरावांनी वसतिगृह सोडले. आणि आयुष्याला एक वेगळेच वळण लागले. कुस्ती-मल्लखांब यासारख्या खेळात ते नेहमीआघाडावर असल्यामुळे त्यांना राजर्षी शाहू महाराजांच्या वाड्यात आश्रय मिळाला, शाहू महाराज्याकडून समाजसेवेचा वारसा घेतला.

**(iii) पुढील विषयावर निबंध लिहा:** **5**

सूर्य उगवला नाही तर ..........

**-------- All the Best --------**